# सोलापूर विद्यापीठ ,सोलापूर
## शैक्षणिक, संशोधन व विकास
## कौशल्य विकासकेंद्र

सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA-2.62

### परिपत्रक

परिपत्रकाअन्वये आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठ, कौशल्य विकासकेंद्रामार्फत दि.३ ते ९ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीत थेरपेटिक न्युट्रीशन व आहारशास्त्र या विषयावर प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षण शिबीरामध्ये सर्व इच्छूक शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी/विद्यार्थीनी यांना सहभागी होता येईल. सदर प्रशिक्षण सशुल्क असून सहभागी होवू इच्छिणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनी यांना रू.२५०/- तर इतरांसाठी रू.७५०/- इतके नोंदणी शुल्क आकारण्यात येईल. याबाबत अधिकची माहिती डॉ.अभिजित जगताप,शिबीर समन्वयक यांच्याशी संपर्क साधावा. ज्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना सदर शिबीरास सहभागी व्हायचे आहे त्यांनी आपल्या विभाग प्रमुख/संचालक यांची पुर्व परवानगी घ्यावी जेणे करून विभागातील दैनंदिन कामकाजावर परिणाम होणार नाही.

डॉ.प्रभाकर कोळेकर
समन्वयक
कौशल्य विकासकेंद्र

**सोविसो/कौशल्य विकासकेंद्र/२०१८/ 8349**

**दिनांकः-** 25 SEP 2018

**स्थळः-ऑडीटोरीयम,यशोधरा हॉस्पिटल,जिल्हा परिषद जवळ,सोलापूर.**

**वेळः- सकाळी ८:०० ते १०:००**

कौशल्य विकास केंद्र

दि.१९/०९/२०१८

**विषय: Therapeutic Nutrition and Dietetics प्रशिक्षण शिबिराच्या आयोजनाबाबत**

सादर,

उपरोक्त संदर्भित विषयास अनुसरून विद्यापीठ कौशल्य विकास केंद्रामार्फत दि.३ ते ९ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत Therapeutic Nutrition and Dietetics या विषयावर प्रशिक्षण शिबीर आयोजित केले आहे. सदर शिबीर हे विद्यापीठाशी संलग्नित विविध संस्थामधील पॅरामेडिकल अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असल्याने सर्व संस्थाना त्यांच्या विद्यार्थ्यांना सदर शिबिरासाठी नावनोंदणी करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. सदर प्रशिक्षण शिबीर शहरातील मध्यवर्ती ठिकाणी ठेवल्यास सदर शिबिरासाठी नाव नोंदणी करण्यास चांगला प्रतिसाद मिळेल असे वाटते. या संदर्भात मा.कुलगुरू महोदय यांच्या परवानगीने सोलापूर शहरातील यशोधरा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी त्यांच्या सभागृहात सदर शिबीर आयोजित करता येऊ शकेल असे सांगितले आहे. सदर प्रशिक्षण शिबिर यशोधरा हॉस्पिटल येथे आयोजित करून शिबिराच्या समारोपाचा कार्यक्रम विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात कारणे उचित राहील असे वाटते.

सबब दि.३ ते ९ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत Therapeutic Nutrition and Dietetics या विषयावरील प्रशिक्षण शिबीर यशोधरा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल सोलापूर यांच्या सभागृहात आयोजित करण्यास प्रशासकीय मान्यता असावी.

17/9/2018

शिबीर समन्वयक

समन्वयक

कौशल्य विकास केंद्र

19-9-2018

विशेष कार्यासन अधिकारी

शैक्षणिक संशोधन व विकास

19/9/18

मा.कुलगुरू

LD3/285

कौशल्य विकासकेंद्र
दि.२७/०९/२०१८

**विषय:-** Therapeutic Nutrition and Dietitics प्रशिक्षण शिबीराची द्वित्तीय बॅच सुरू करण्यास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

**सादर,**

उपरोक्त विषयास अनुसरून कौशल्य विकासकेंद्रामार्फत दि.३ ते ९ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीत Therapeutic Nutrition and Dietitics या विषयावरील प्रशिक्षण शिबीराचे आयोजन यशोधरा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल,सोलापूर येथे करण्यास मा.कुलगुरू महोदय यांनी दि.१९/०९/२०१८ रोजीच्या टिपणी अन्वये मान्यता दिलेली आहे.

मा.प्राचार्च,आर.वाय.पाटील,कॉलेज ऑफ फार्मसी,जुळे सोलापूर येथील विद्यार्थ्यांचा प्रतिसाद पाहता त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी सदर प्रशिक्षण शिबीर दि.३ ते ९ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीत संबंधित कॉलेज मध्ये दुपारी ४ ते ६ या वेळेत आयोजित करण्यात यावे अशी विनंती केली आहे.

कॉलेज ऑफ फार्मसी येथे प्रशिक्षण शिबीर दि.३ ते ९ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीत संबंधित कॉलेज मध्ये दुपारी ४ ते ६ या वेळेत द्वित्तीय बॅच सुरू केली तर प्रशिक्षकांचे वाढीव मानधन करण्यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | बाब | तपशील | अपेक्षित अंदाजे खर्च |
|---|---|---|---|
| १ | प्रशिक्षकाचे वाढीव मानधन | रू.१००० प्रति सेशन x ७ दिवस | रू.७०००/- |
| २ | इतर खर्च | | रू.३०००/- |
| **एकूण अंदाजे खर्च** | | | **रू.१००००/-** |

सबब,

१.सदर प्रशिक्षण शिबीरसाठी द्वित्तीय बॅच कॉलेज ऑफ फार्मसी येथे दि.३ ते ९ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीत दुपारी ४:०० ते ६०० या वेळेत घेण्यास मान्यता असावी.

२.सदर प्रशिक्षण शिबीरासाठी वाढीव मानधन व इतर खर्च मिळून रू.१००००/- खर्चास मान्यता असावी.

लिपिक

डॉ.ए.एच.जगताप
शिबीर समन्वयक

डॉ.प्रभाकर कोळेकर
समन्वयक
कौशल्य विकासकेंद्र

27-9-2018

प्रा.डॉ.व्ही.बी.पाटील
विशेष कार्यासन अधिकारी
शैक्षणिक,संशोधन व विकास

Rs. 1500/- per session
27/9/18

**मा.कुलगुरूसो.**

NAAC Accreditied-2015
'B' Grade (CGPA 2.62)

## सोलापूर विद्यापीठ,कौशल्य विकास केंद्रामार्फत आयोजित

# थेरपेटिक न्यूट्रीशन व आहारशास्त्र प्रशिक्षण शिबीर

## दि.३ ते ९ ऑक्टोबर,२०१८

## स्थळ:-ऑडीटोरीयम,यशोधरा हॉस्पिटल,जिल्हा परिषद जवळ,सोलापूर

## वेळ: सकाळी ८:०० ते १०.३०

थेरपेटिक न्यूट्रीशन हे अन्नाशी संबंधित शास्त्र आहे. पोषक द्रव्ये,अन्नघटक व पोषकता आणि त्यांचा शरीरावर होणारा परिणाम याचाच अभ्यास या शास्त्रात होतो. अन्नाबाबतीतील प्रत्येक गोष्ट,खाण्यापासून ते त्याचा निचरा होईपर्यंतच प्रत्येक गोष्ट न्यूट्रीशन मध्ये अंर्तभूत आहे. अन्नघटकांचे आरोग्यातील महत्व तसेच विविध आजारांमधील पोषण कसे असावे याचा अभ्यास थेरपेटिक न्यूट्रीशन या शास्त्राद्वारे केला जातो.

"आहार शास्त्र" हे योग्य आहार घेण्याची कला शिकवणारे शास्त्र असून विविध वयोगटातील,वेगवेगळया परिस्थितील लोकांच्या आरोग्य परिस्थितीनुसार व त्यांच्या आहाराच्या व पोषकतेच्या तत्वांचा यामध्ये अभ्यास केला जातो. समतोल आहार हे निरोगी जीवनाचे मूळ आहे. त्यामुळे शरीरप्रकृती चांगली रहाते, व रोगांपासूनही संरक्षण होते.

सोलापूर शहर झपाटयाने वाढत आहे. फास्ट फूड संस्कृती हळूहळू सोलापूर शहरात रूजत आहे आणि अशावेळी चुकीच्या आहारामुळे सामान्य जनतेस मधुमेह,उच्च रक्तदाब अशा लाईफस्टाईल आजारास सामोरे जावे लागत आहे. अशावेळी प्रत्येक व्यक्तीस आहार व पोषण यासंबंधी माहिती असणे गरजेचे आहे. नेमकी हीच गरज ओळखून सोलापूर विद्यापीठ कौशल्य विकास केंद्राने दि.३ ते ९ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीत पोषण व आहारशास्त्र या विषयावबर प्रशिक्षण शिबीराचे आयोजन केलेले आहे.

सदर प्रशिक्षण सर्वांसाठी खुले असून विशेषत:वैद्यकीय,नर्सिंग विद्यार्थी तसेच शारीरिक शिक्षण प्रशिक्षक यांच्यासाठी उपयुक्त असून सदर प्रशिक्षण शिबिरासाठी विद्यार्थ्यांना रू.२५०/- तर इतर व्यक्तीसांठी रू.७५०/- इतके नोंदणी शुल्क आकारण्यात येणार आहे. प्रशिक्षण शिबीर पुर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना/व्यक्तींना विद्यापीठ कौशल्य विकास केंद्रामार्फत प्रमाणपत्र दिले जाणार आहे. सदर शिबीरासाठी नाव नोंदणी चालू झालेली असून ज्यांना नाव नोदणी करावयाची आहे, त्यांनी शिबीर समन्वयक डॉ.अभिजीत जगताप यांच्याशी ९७३०१०५९६१ अथवा (०२१७-२७४४७७४-Ext No-२२८) या क्रमांकावर संपर्क साधावा.

सोलापूर विद्यापीठ ★ सोलापूर ★

# कौशल्य विकास केंद्र
# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

आयोजित

## Therapeutic Nutrition & Dietetics Training Workshop
## (पोषण व आहारशास्त्र प्रशिक्षण शिबीर)




## दि.३ ते ९ ऑक्टोबर २०१८

**स्थळ: ऑडीटोरीयम, यशोधरा हॉस्पिटल, जिल्हा परिषद जवळ, सोलापूर**

सदर शिबिरामध्ये तज्ञ मार्गदर्शकांद्वारे Therapeutic Nutrition and Dietetics (पोषण व आहारशास्त्र)या विषयावर शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्यात येणार असून प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या व्यक्तींना सोलापूर विद्यापीठ कौशल्य विकास केंद्राकडून प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. सदर शिबिराबाबतची विस्तृत माहिती सोलापूर विद्यापीठाच्या http://su.digitaluniversity.ac/ या संकेतस्थळावर "कौशल्य विकास केंद्र" या शीर्षकाअंतर्गत उपलब्ध आहे. सदर प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांना रु.२५० तर इतर व्यक्तींसाठीरु.७५० इतके शुल्क असून ज्या इच्छुकांना सदर शिबिरात नाव नोंदवायचे आहे त्यांनी विद्यापीठ वैद्यकीय अधिकारी डॉ.अभिजित जगताप यांच्याशी ९७३०१०५९६१ अथवा (०२१७-२७४४७७४ –Ext.२२८) या क्रमांकावर संपर्क साधावा.

सोलापूर विद्यापीठ सोलापूर

# SOLAPUR UNIVERSITY, SOLAPUR

Skilled People
Training / Building Workshop
Enhancing Capabilities & Performance

सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA-2.62)



## Skill Development Centre

### Therapeutic Nutrition & Dietetics Training Workshop

*3rd - 9th October 2018*

## CERTIFICATE

*Sr. No. SDW/10/2018 -* 294

*This is to certify that Mr./Ms.* Shaikh Simran A. Jabbar *has attended and successfully completed* **Therapeutic Nutrition & Dietetics Training Workshop** *organized by Skill Development Centre, Solapur University from 3rd - 9th October 2018.*

| Dr. Manali Kane | Dr. Abhijeet Jagtap | Dr. P. N. Kolekar | Prof. Dr. Vikas Patil | Dr. Mrunalini Fadnavis |
|---|---|---|---|---|
| Nutrition & Dietetics Trainer | Workshop Co-ordinator | Co-ordinator SDC | O.S.D. (A R & D) | Hon. Vice-Chancellor |




Training Workshop
on
Therapeutic Nutrition and Dietetics
organized by


on







लोकमत

# निरोगी राहायचंय... समतोल आहार ठेवा !

## आहारशास्त्र कार्यशाळा: सोलापूर विद्यापीठाचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क



सोलापूर विद्यापीठाच्यावतीने आयोजित आहारशास्त्र कार्यशाळेत बोलताना व्ही. बी. पाटील, डॉ. मनाली काणे, डॉ. सुरेश पवार, प्रभाकर कोळेकर, विजय शिवपूजे आदी.

**सोलापूर:** धकाधकीच्या जीवनात निरोगी राहायचंय तर सकस आणि समतोल आहार घ्यायला हवा. आहारासंबंधी सामान्य जनतेमध्ये अज्ञान आढळून येते. अशावेळी आहारशास्त्राशी निगडित अभ्यासक्रमाचे ज्ञान घ्या, ती काळाची गरज असल्याचे प्रतिपादन सोलापूर विद्यापीठाचे विशेष कार्यासन अधिकारी प्रा. व्ही. बी. पाटील यांनी केले.

सोलापूर विद्यापीठाच्या कौशल्य विकास केंद्रामार्फत यशोधरा रुग्णालय आणि जुळे सोलापूर येथील कॉलेज ऑफ फार्मसी येथे थेरपेटिक न्यूट्रिशन व आहारशास्त्र या विषयावर आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी आहारतज्ज्ञ डॉ. मनाली काणे, विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. सुरेश पवार, कौशल्य विकास केंद्राचे डॉ. प्रभाकर कोळेकर, डॉ. शिवपुजे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी विद्यापीठाचे वैद्यकीय अधिकारी व कार्यशाळेचे समन्वयक डॉ. अभिजित जगताप यांनी कार्यशाळेची माहिती दिली.

यावेळी डॉ. पाटील यांनी आहारशास्त्राशी निगडित विविध अभ्यासक्रम विद्यापीठाकडून लवकरच सुरु करण्यात येणार असल्याचे सांगितले. कुलगुरु प्रा. डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या संकल्पनेतून ही कार्यशाळा होत असून, यास सोलापूरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याचे डॉ. जगताप यांनी सांगितले.

सकाळच्या सत्रात यशोधरा रुग्णालय व दुपारच्या सत्रात फार्मसी कॉलेज येथे ही कार्यशाळा होत आहे. मंगळवारी नऊ ऑक्टोबरपर्यंत ही कार्यशाळा चालणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या कार्यशाळेस नर्सिंग, वैद्यकीय, शारीरिक शिक्षण संचालक, पॅरामेडिकल विद्यार्थी अशा २०० हून अधिक जणांनी नावनोंदणी केली आहे. या कार्यशाळेसाठी यशोधरा नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य
माळी,
चिदानंद
फार्मसी कॉ
प्रा. सो
पाटील, प्रा.
थोरात व क
विकास
खुने यांचे स
लाभले.

कृपया अनावश